**स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या अंमलबजावणी करण्याकरीता पुणे शहराकरीता विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) च्या रचनेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्र. स्मार्टसि.-पुणे-२०१६/प्र.क्र.९४/नवि-२३**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १४ मार्च, २०१६

वाचा :- (१) केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियानाच्या जून, २०१५ मध्ये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना
(२) शासन परिपत्रक, नगर विकास विभाग, क्रमांक-स्मार्टसि-२०१५/प्र.क्र.१३०/नवि-३३, दिनांक ०१ जुलै, २०१५
(३) आयुक्त, पुणे महानगरपालिका यांचे दिनांक १८.०२.२०१६ चे पत्र

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने स्मार्ट सिटी अभियान हे महत्वाकांक्षी अभियान राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुषंगाने स्मार्ट सिटीच्या स्पर्धात्मक प्रक्रियेतील दुसऱ्या फेरीत निवडलेल्या २० शहरांमध्ये पुणे शहराची दुसऱ्या क्रमांकाने निवड झाली आहे. तसेच केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १६.२.२०१६ च्या पत्रान्वये विशेष उद्देश वाहनाची (एस.पी.व्ही.) रचना करणे व स्मार्ट सिटी प्लॅन सुधारीत करुन त्याबाबतचा अहवाल सादर केल्यानंतर केंद्र शासनाने स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत पहिला हप्ता वितरीत करणार असल्याचे कळविले आहे.

त्यानुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने ठराव क्र. ६४९, दिनांक १४.१२.२०१५ अन्वये ठराव केला असून उक्त विशेष उद्देश वाहनाची (एस.पी.व्ही.) रचनेचा आराखडा शासनाकडे मंजूरीसाठी सादर केला आहे. तसेच शासन स्तरावरुन विविक्षित बाबींविषयी निर्धारण करुन मिळणेबाबत संदर्भाधीन क्र. ३ च्या प्रस्तावान्वये विनंती केली आहे.

स्मार्ट सिटी अभियानाच्या वित्तीय आकृतीबंधास व स्मार्ट सिटी अभियानाच्या अंमलबजावणीसाठी राज्य हिश्याचा निधी उपलब्ध करुन देण्यास व याबाबत वित्यव्य राखून ठेवण्यास व याबाबतच्या दिनांक २३.७.२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तद्नुषंगाने शासनाने संदर्भ क्र. २ अन्वये शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. मंत्रीमंडळाने स्मार्ट सिटी योजना राबविण्यास तसेच आवश्यक आर्थिक व प्रशासकीय बाबींकरीता मंजुरी प्रदान केली आहे.

पुणे महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाच्या पुणे शहरासाठी निर्माण करण्यात येणाऱ्या विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) ची रचना करण्याबाबत शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

पुणे महानगरपालिकेचा प्रस्ताव, उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमुद बाबी व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी अंतर्गत प्राप्त अधिकाराच्या अनुषंगाने खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

I) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना १०.६ नुसार विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) च्या स्थापनेस मान्यता देण्यात येत आहे.

II) कंपनी अधिनियम, २०१३ अन्वये नव्याने गठीत विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) ही शासकीय (Government Company) कंपनी असेल.

III) उक्त विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) यांच्या रचनेत महानगरपालिका, महाराष्ट्र शासन, केंद्र सरकार, स्वातंत्र संचालक यासह १५ संचालक मंडळास मान्यता देण्यात येत आहे. सदर संचालक मंडळातील विविध भागधारक (Stakeholders) यांचे संचालक मंडळातील प्रतिनिधीत्वास खालील मान्यता देण्यात येत आहे :-

- पुणे महानगरपालिका ६ संचालक
- महाराष्ट्र शासन ४ संचालक
- केंद्र शासन १ संचालक
- २ स्वतंत्र संचालक (या संचालकाची निवड केंद्रीय कंपनी व्यवहार, मंत्रालयाने प्रसिध्द केलेल्या संचालकाच्या डेटा बँकमधून करण्यात येईल.)
- पुणे महानगरपालिका आयुक्त
- मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.)

उक्त रचनेच्या अनुषंगाने विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) मध्ये खालील प्रमाणे संचालक, नामनिर्देशीत करण्यात येत आहेत:-

अ) पुणे महानगरपालिका:-

१) महापौर, पुणे महानगरपालिका
२) अध्यक्ष, स्थायी समिती पुणे महानगरपालिका
३) सभागृह नेता, पुणे महानगरपालिका
४) विरोधी पक्षनेता, पुणे महानगरपालिका

तसेच व्यापक राजकीय प्रतिनिधीत्व देण्याच्या उद्देशाने विविध राजकीय पक्षाच्या प्रतिनिधींना विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) वर प्रतिनिधित्व मिळणे आवश्यक आहे याकरीता वरील अ.क्र. १ ते ४ येथील पदनिर्देशित संचालक म्हणून नियुक्त केलेले नगरसेवक ज्या राजकीय पक्षाचे प्रतिनिधीत्व करीत असतील असे राजकीय पक्ष वगळून महानगरपालिकेमधील इतर राष्ट्रीय/राज्य मान्यताप्राप्त दोन राजकीय पक्षांच्या संख्याबळाच्या उतरत्या क्रमानुसार प्रत्येकी एक या प्रमाणे महासभेकडून दोन संचालक नामनिर्देशित करण्यात येतील.

ब) राज्य शासनाचे नामनिर्देशीत संचालक:-

१) विभागीय आयुक्त , पुणे
२) पोलिस आयुक्त, पुणे
३) सह संचालक, नगररचना पुणे विभाग
४) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

क) तसेच याव्यतिरिक्त सदर विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) मध्ये खालील पदनिर्देशित अधिकाऱ्यांची संचालक पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

१) आयुक्त, पुणे महानगरपालिका हे सदर विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) चे सदस्य व अध्यक्ष राहतील.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) हे सदर संचालक मंडळाचे कार्यकारी संचालक राहतील.

ड) पुणे महानगरपालिकेकरीता स्मार्ट सिटी योजनेकरीता नियुक्त मार्गदर्शक (Mentor) हे विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) च्या सल्लागार मंडळाचे अध्यक्ष असतील.

IV) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) चे गठन करण्याकरीता आवश्यक असलेले सुरुवातीचे भाग भांडवल रुपये पाच लाख इतक्या रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

यापैकी शासनाचा ५० टक्के वाटा म्हणून रुपये अडीच लाख इतक्या रकमेच्या भाग भांडवलास मान्यता देण्यात येत आहे.

सदर भाग भांडवल आवश्यकतेनुसार वाढविण्यास विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) मुभा असेल.

V) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) करीता महानगरपालिका व शासन यांचे समसमान भागभांडवल असणे आवश्यक आहे. महानगरपालिकेने त्यांच्या ५० टक्के हिश्याकरीता ६ भागधारक निर्देशित केले असून शासनाच्या ५० टक्के हिश्याचे एक भागधारक म्हणून विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना नामनिर्देशित करण्यात येत आहे.

VI) विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) चे सुधारीत अर्टीकल ऑफ असोशिएशन (AoA) आणि मेमोरेन्डम ऑफ असोशिएशनला (MoA) मान्यता देण्यात येत आहे.

VII) कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत गठीत कंपनीचे विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) नाव व लोगो काय असावा याबाबत अधिकार विशेष उद्देश वाहन (एस. पी.व्ही.) च्या संचालक मंडळास असतील.

VIII) उक्त विशेष उद्देश वाहन (एस.पी.व्ही.) चे रजिस्टर्ड कार्यालय पुणे महानगरपालिकेच्या मुख्य इमारतीत असेल.

IX) कंपनी नोंदणी संदर्भात अर्ज व इतर सर्व कायदेशीर कादगपत्रे यांचेवर पुणे महानगरपालिका व राज्य शासनाच्यावतीने महापालिका आयुक्त यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

X) अर्टीकल ऑफ असोशिएशन आणि मेमोरेन्डम ऑफ असोशिएशन मधील मसुद्यास केंद्रशासन, राज्यशासन व रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांनी भविष्यात सूचविलेल्या दुरुस्तीस पुणे महानगरपालिका व राज्य शासनाच्यावतीने महापालिका आयुक्त यांना स्वाक्षरी करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१६०३१५१५१९४०१४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ajit Malhari
Kawade

(अजित म.कवडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव
४. मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री, उद्योग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.मंत्री यांचे खाजगी सचिव (उर्वरीत सर्व), मंत्रालय, मुंबई
९. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा.राज्यमंत्री सर्व विभाग यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
११. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१२. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग,
१४. अप्पर मुख्य सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
१५. प्रधान सचिव, नगर विकास विभाग-१, मंत्रालय, मुंबई
१६. सचिव, (नगर विकास-२), मंत्रालय, मुंबई
१७. महासंचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई
१९. महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपुर
२०. सर्व विभागीय आयुक्त
२१. सर्व जिल्हाधिकारी
२२. उप सचिव (अर्थसंकल्प), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२३. आयुक्त, पुणे महानगरपालिका
२४. निवड नस्ती, नवि-२३.